दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २७१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.३१ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### मुंबई कस्टम झोनची धडक कारवाई

# पनवेल जवळील तळोजात ५३८ कोटींचे ड्रग्ज केले नष्ट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**मुंबई कस्टम झोन- ३ तर्फे विविध ठिकाणच्या कारवाईतून गेल्या वर्षभरात जप्त केलेले ५३८ कोटी रुपये किमतीचे १४०.५७ किलो ड्रग्ज आज पनवेल जवळील तळोजा येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड फॅसिलीट याठिकाणी नष्ट करण्यात आले.**



देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी छापे मारुन मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ जप्त करून ते एकत्रीत साठवले जातात त्यानंतर साठवलेले हे अंमली पदार्थ उच्च अधिकाऱ्यांच्या परवानगीने डिस्पोजल कमिटीच्या समक्ष जाळून नष्ट करण्याची कारवाई केली जाते. याअंतर्गत मुंबई कस्टम झोन- ३ तर्फे गेल्या वर्षभरात जप्त केलेले ५३८ कोटी रुपये किमतीचे १४०.५७ किलो ड्रग्ज तळोजातील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड फॅसिलीट याठिकाणी नष्ट करण्यात आले. यामध्ये मुंबई विमानतळ आयुक्तालयाने १४ प्रकरणांमध्ये जप्त केलेले ५६.०६ किलो हेरॉईन आणि ३३.८१ किलो चरस, एअर कार्गो निर्यात आयुक्तालयाने गुन्ह्यात जप्त केलेले २१.७० किलो चरस, तर महसूल गुप्तचर संचालनालयाने (ऊछख) ने एका प्रकरणात जप्त केलेले २९ किलो हेरॉईन यांचा समावेश आहे. या कारवाईवेळी मुंबई कस्टम्सचे प्रधान आयुक्त राजेश सॅनन यांच्यासह आणि ड्रग्ज नष्ट करण्याच्या ऑपरेशनचे प्रभारी अधिकारी यांच्या उपस्थित होते. यावेळी राजेश सॅनन यांनी सांगितले कि, ड्रग्सची तस्करी हि प्रामुख्याने केनिया, युगांडा, झांबिया आणि झिम्बाब्वे या देशांतील नागरिकांकडून केली जाते. बॅगेजमध्ये बनविलेल्या खास खोट्या पोकळ्यांमध्ये औषधे लपवून अंमली पदार्थांची तस्करी केली जाते. मुंबई विमानतळ कस्टम्सने या केसेस शोधण्यासाठी स्निफर डॉगचा प्रभावीपणे वापर केला आहे.

# दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी लेखी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दहावी आणि बारावीच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने लेखी परीक्षेसाठी अंतिम वेळापत्रक जाहीर केले आहे. बारावीची परीक्षा मंगळवार २१ फेब्रुवारी २०२३ ते मंगळवार २१ मार्च २०२३ या काळात होईल, तर दहावीची परीक्षा गुरुवार २ मार्च २०२३ ते शनिवार २५ मार्च २०२३ या कालावधीत पार पडतील. यंदा परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमांवर होणार आहेत. ज्यादाचा वेळ मिळणार नाही. करोनापूर्वी जशा परीक्षा होत होत्या तशाच परीक्षा होणार आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी, बारावी परीक्षेच्या अनुषंगाने आधीच तयारी सुरू केली होती. करोनानंतर नियमित परीक्षा होत असल्याने, परीक्षा केंद्र, बैठक व्यवस्थेची मंडळाकडून चाचपणी करण्यात आली. आठ डिसेंबरपासून पुन्हा जिल्हानिहाय बैठकांचे नियोजन करण्यात आले होते. विभागात दहावी, बारावी परीक्षेसाठी नोंदणी संख्या वाढली आहे.

करोना प्रादुर्भावामुळे २०२१ ची दहावी, बारावी परीक्षा झाली नव्हती. त्यासाठी अंतर्गत मूल्यमापन गुणदान करण्यात आले होते. २०२२ मध्ये करोनाचा प्रादुर्भाव कायम होता. परीक्षा घेण्यात आली, परंतु शाळा तेथे केंद्र, २५ टक्के अभ्यासक्रम कमी, अधिकचा वेळ असे बदल मंडळाने केले होते. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने २०२३ ची परीक्षा २०२० मध्ये झाली त्याप्रमाणे घेण्यासाठी मंडळाने तयारी केली आहे. शाळा तेथे परीक्षा केंद्र नसणार. त्यामुळे परीक्षेची व्यवस्था पूर्ववत करण्यासाठी मंडळाची धांदल वाढली. शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, परीक्षार्थींची संख्या, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था, सोयीसुविधांबाबतचा आढावा विभागीय पातळीवर निश्चित करण्यात आला. यंदा दहावी, बारावीचे सुमारे वीस नवीन परीक्षा केंद्र वाढू शकतात, असे सांगण्यात येत आहे. दहावीसाठी विभागात पाच जिल्ह्यांत साडेसहाशेपेक्षा अधिक, तर बारावीचे पावणेचारशेपर्यंत परीक्षा केंद्र संख्या असतील असे सांगण्यात येते. जिल्हानिहाय बैठकांमधून परीक्षा केंद्रांचा पुन्हा आढावा घेतला जाणार आहे.

# पनवेलच्या ग्रामीण भागात गोवरचे चार रुग्ण तर संशयित ३२

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात गोवरचे चार रुग्ण सापडून आले आहेत. तर संशयित ३२ रुग्ण सापडून आल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे.

गोवरची संख्या दिवसेंदिवस परिसरात वाढू लागलेली आहे. पनवेल तालुक्यातील वडघर येथे एक, उलवे येथे एक आणि बारापाडा येथे दोन असे ४ गोवरचे रुग्ण सापडून आले आहेत. तर ३२ संशयित रुग्ण सापडून आले आहेत. जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून गोवर रुबेला लसीकरणासाठी १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत जिल्ह्यामध्ये विशेष मोहीम राबविली जाणार आहे. या विशेष मोहिमेत आरोग्य विभागाकडून २६ जानेवारी २०२३ पर्यंत सर्व लाभार्थी मुलांचे लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून लसीकरण करण्यासाठी जिल्ह्यामध्ये पथके कार्यरत करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे व जिल्हा माताबालसंगोपन अधिकारी डॉ.प्रताप शिंदे यांनी दिली आहे.

या मोहिमेत डोस देण्याचे राहिलेल्या मुलांना घरोघरी सर्वेक्षण करून नजिकच्या लसीकरण केंद्रावर लसीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये शिल्लक राहिलेला पहिला किवा दुसरा डोस देण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून पूर्व तयारी करण्यात आली आहे.


तसेच जिल्ह्यात ७४ विशेष लसीकरण सत्र आयोजित करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे नियमित १ हजार ७६० लसीकरण सत्रामध्ये गोवर लसीकरण केले जाईल. ९ महिने ते ५ वर्ष वयोगटातील बालकांचे गोवर रुबेला लसीकरण झाले नसल्यास तत्काळ नजिकच्या आंगणवाडी केंद्र, आरोग्य केंद्राकडे संपर्क करुन लसीकरणासाठी आरोग्य विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे व जिल्हा माताबालसंगोपन अधिकारी डॉ.प्रताप शिंदे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे यांनी केले आहे.

# कंटेनर चालकाच्या चुकीने कारचा अपघात; १ ठार २ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील जेएनपीटी रोडवर कंटेनर चालकाच्या चुकीमुळे झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील महिलेचा मृत्यू तर दोघे जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पनवेल शहरातील कल्पतरु रिव्हर्स साईड, तक्का येथे राहणारे संजिवकुमार सिंग (वय ४०) हे त्यांची मारुती कार क्र. MH-46- B-7471 ने पनवेल जेएनपीटी रोडवर उरणकडे जात असताना सेक्टर ०५ पुष्पकनगर येथे त्यांची कार आली असता एका अज्ञात कंटेनर चालकाने धोकादायकरित्या पार्क केलेली त्याच्या ताब्यातील कंटेनर रस्त्याच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन करून अचानकपणे सुरु करुन लेन कटींग केली. त्यामुळे पाठीमागून आलेल्या संजीव यांच्या कारची कंटेनरला जोरदार धडक बसली. या अपघातात संजिवकुमार सिंग व त्यांची १० वर्षाची चिमुकली श्रेयषी सिंग हे गंभीर जखमी झाले आहे. तर संजीव यांची पत्नी रश्मी सिंग (वय ३५) हिचा मृत्यू झाला आहे. या घटनेची पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे तक्का परिसरात शोककळा पसरली आहे.



# नवीन वर्षात मुंबईत थंडी वाढणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भारतीय हवामान विभागाने येत्या आठवड्यात उत्तर भारतात थंडीची लाट येण्याचा अंदाज वर्तवला आहे. उत्तर भार- तासह याचा परिणाम मुंबईसह इतर भागांवरही होऊ शकतो. त्यामुळे येतं नवं वर्ष थंडी सोबत घेऊन येणार आहे. २ जानेवारीपासून मुंबईतील किमान तापमानात घट होणार आहे. मुंबई शहराच्या हवेची गुणवत्ता खराब झाली आहे. मुंबईची एअर क्वालिटी इंडेक्स २९९ सह 'खराब' श्रेणीत आहे. तर, नवी मुंबईची हवा ३३४ सह 'अत्यंत खराब' श्रेणीत आहे. IMD अधिकारी होसाळीकर यांच्या म्हणण्यानुसार, खचऊ ने पुढील चार आठवड्यांसाठी देशभरातील किमान तापमानाचा विस्तारित अंदाज दर्शवितो की संपूर्ण जानेवारी महिन्यात उत्तर भारतातील बहुतेक भागांमध्ये १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान राहील. पंजाब, हरियाणा, चंदीगड, उत्तर प्रदेश, दिल्ली आणि उत्तर-राजस्थानला येत्या आठवड्यात थंड लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

# धारावी देशातील सर्वात मोठा पुनर्वसन प्रकल्प : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै.रायगड नगरी । नागपूर**

धारावी हा देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा पुनर्वसन प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून ४६ हजार १९१ निवासी परिवारांचे तर १२ हजार ९७४ अनिवासी असे एकूण ५९ हजार १६५ परिवाराच्या पुनर्विकासाचा हा प्रकल्प आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान सभेत एका लक्षवेधीला उत्तर देताना दिली. या संदर्भातील लक्षवेधी सदस्या प्रा. वर्षा गायकवाड यांनी उपस्थित केली होती.

गाळे संदर्भात घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. या प्रकल्पातील प्रत्येक व्यक्तीला सध्याच्या घरापेक्षा अधिक क्षेत्राची सदनिका मिळणार आहे असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

फडणवीस म्हणाले की, धारावीत राहणाऱ्या लोकांना आता राहतात त्यापेक्षा चांगल्या सदनिका देण्याच्या उद्देशाने निविदा काढण्यात आली होते. या निविदेनंतर रेल्वेची जागा मिळाली. त्यामुळे नव्याने निविदा काढायचे ठरले. यासाठी मोठी कामे केलेल्या कंपन्यांना आमंत्रित केले. या निविदेमध्ये मध्ये सुधारणा करुन पुन्हा निविदा काढण्यात आली. तीन कंपन्यांनी ती भरली. अटी शर्तींची पुर्तता करुन ही निविदा मान्य करण्यात आली.

धारावी हे बिजनेस हब आहे. त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. देशाच्या व राज्याच्या आर्थिक घडामोडीत धारावीचे योगदान मोठे आहे. या गोष्टी नजरेसमोर ठेवून नियोजन करावे लागणार आहे. म्हणूनच इथे इंडस्ट्रीयल आणि बिझनेस झोन तयार करण्यात येणार आहे. या मध्ये सुविधा केंद्र तयार करुन देणार आहे. याचा धारा- वीतील उद्योजकांना फायदा होणार आहे. त्यांचे पुनर्वसन झाल्यानंतर पुढील पाच वर्षासाठी कर माफी देखील करण्यात आली आहे. ज्यांच्याकडून घेतलेल्या जीएसटीचा परतावा देखील देण्यात येणार आहे. या पुनर्विकसीत इमारती मेंटेंनस फ्री असतील. अधिकृत धार्मिक स्थळे संरक्षित केले जातील. सन २०११ पर्यंतचे रहिवासी संरक्षित आहेतच परंतु त्यानंतरचे जे अपात्र ठरतात त्यांना भाड्याने घरे देण्यात येतील, असा कायदेशीर मार्ग काढण्यात आला आहे. या ठिकाणी ज्या आकाराची घरे आहेत त्यापेक्षा जास्त आकाराची घरे देण्यात येणार आ- हेत. इथे राहणाऱ्या प्रत्येकाला चांगले घर देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# शून्य कचरा मोहिमेच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वच्छ भारत आणि माझी वसुंधरा अंतर्गत आज(३० डिसेंबर) पनवेलमधील प्रभाग १८ मधील वडाळे तलाव बल्लाळेश्वर विसर्जन घाट येथे इंडियन कोस्टल गार्ड शालेय विद्यार्थी , महापालिका अधिकारी ,कर्मचारी आणि नागरिक यांच्या साहाय्याने शून्य कचरा मोहीम राबविण्यात आली.



या शून्य कचरा मोहिमेच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश उपस्थितांना देण्यात आला. आयुक्त श्री. गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

या सफाई मोहिमे अंतर्गत इंडियन कोस्टल गार्डचे स्वयंसेवक ,नागरिक, महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थ्यांनी यांनी वडाळे तलावाच्या विसर्जन घाटाची साफसफाई केली. 'स्वच्छता हि सेवा' या ब्रीदवाक्यासह करण्यात आलेल्या या सफाई मोहिमेमध्ये तलावातील सर्व प्लॅस्टिक व कचरा जमा करण्यात आला. उपायुक्त कैलास गावडे यांच्या सूचनेनूसार हा कार्यक्रम घेण्यात आला.



उपायुक्त सचिन पवार आणि सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका क्षेत्रात स्वच्छ भारतअभियानाअंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण २०२२-२३' ची प्रभावी अमंलबजावणी सुरू आहे. पनवेल शहराच्या स्वच्छतेवरती महापालिकेने विशेष लक्ष दिले आहे. विशेषतः स्वच्छता हा नागरिकांच्या सवयीचा भाग व्हावा, लोकांमध्ये जनजागृती वाढावी, यासाठी पालिका विविध उपक्रम राबवित आहे. 'शून्य कचरा उपक्रम' हा त्याचाच एक भाग आहे. पनवेल शहर स्वच्छ व सुंदर व्हावे यासाठी पालिकेच्यावतीने विविध पातळ्यावरती प्रयत्न करते आहे.

नागरिकांनी सण, समारंभ साजरे करताना प्लॅस्टिक वस्तु टाळून, पर्यावरणपूरक वस्तुंचा वापर करावा जेणे करून पर्यावरणाचे रक्षण होईल तसेच जास्तीचा कचरा निर्माण होणार नाही याबाबत यावेळी विद्यार्थी, नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. नागरिकांनी स्वच्छतेविषयी जागरूक राहून 'शून्य कचरा उपक्रम' राबवावा असे आव- ाहन यावेळी महापालिकेच्यावतीने करण्यात आले.

यावेळी प्रभाग अधिकारी अमर पाटील, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, स्वच्छता निरीक्षक जयेश कांबळे ,पर्यवेक्षक,आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# नववर्षाच्या स्वागतासाठी काशिद-बिच पर्यटकांनी फुलला

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटनात पटलावर नावारूपाला आलेल्या मुरुड तालुक्यातील काशिद-बिच समुद्र किनारा पर्यटकांनी फुलला असून रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या लांबचलांब रांगा लागलेल्या दिसून येतात.

काशिद-बिच समुद्र किनारा भरतीच्या वेळेस फेसाळणारे पाणी, उसळणाऱ्या लाटा, किनाऱ्यावरील शुभ्र वाळू येथे पर्यटकांना आकर्षित करते.पर्यटकांच्या सोयी-सुविधात याठिकाणी असलेली स्पीडबोट, पॅरेसेलिंगबोट,बनाना, बंफर तसेच घोडा-उंटावरील सफर पर्यटनाचा आनंद द्विगुणीत करते. याठिकाणी विविध खाद्य-पेय चहा-नाष्टा सोयी सुविधा उपलब्ध आहेत. याठिकाणी दर शनिवार, रविवार तसेच सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत असतात. रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅमलाही सामोरे जावे लागते. देश-विदेशातील पर्यटक देखील आवर्जून भेट देत असतात.

पर्यटकांच्या सुरक्षेसाठी लाईफ गार्ड,स्थानिक,स्टॉलधारक ,ग्रामपंचायत चे सहकार्य लाभते. पोलीस ही आपली कामगिरी उत्तम प्रकारे पार पाडतात.ग्रामपंचायत तसेच डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, श्रीसदस्य, विविध सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून या ठिकाणी वेळोवेळी स्वच्छता अभियान राबविण्यात येत असल्याने समुद्र किनारा चकाचक करण्यात येत असतो.आतापासूनच याठिकाणी पर्यटकांची मांदियाळी दिसून येते आहे. सरत्या २०२२ सालाला निरोप देण्यासाठी व सन.२०२३ चे स्वागत करण्यासाठी काशिद-बिच समुद्र किनारा फुलला असून थर्टीफस्टसाठी लॉंज बुकिंग फुल होऊ लागले आहेत. नववर्षाच्या स्वागतासाठी समुद्र किनारे पर्यटकांनी फुलले आहेत!



# जेल आणि जामीन

महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांना मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रश्नांची उत्तरे उच्च न्यायालयाच्या सुनावणीत सापडणार नाहीत. तसेच, केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या विरोधात केलेल्या सर्वोच्च न्यायालयातील याचिकेतही मिळणार नाहीत. सर्वोच्च न्यायालयात या याचिकेचा निकाल लागण्यास वेळ लागू शकतो. मात्र, तो निकाल लागेपर्यंत देशमुख यांचा जामीन रोखून धरण्यास उच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. याचा अर्थ, सीबीआय आणि सीबीआयच्या नियंत्यांनी समजून घेतला असेल. अनिल देशमुख यांची केवळ जामिनावर सुटका झाली आहे. ते निर्दोष मुक्त झालेले नाहीत. तेव्हा त्यांनी तुरुंगाबाहेर आल्यानंतर अतिरेकी जल्लोष, घोषणाबाजी, मिरवणुका आणि राणा भीमदेवी विधाने करणे हे जसे योग्य नाही; त्याचप्रमाणे, या ज्येष्ठ नेत्याला जवळपास १४ महिने जामिनाविना तुरुंगात काढायला लागावा, इतका मोठा गुन्हा सिद्ध होण्यासारखी परिस्थिती आहे का, याचाही विचार करावा लागेल. देशमुख यांच्यावरील आरोपांमध्ये प्रथमदर्शनी तरी तथ्य दिसत नाही, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले. ते या खटल्याच्या पुढच्या प्रवासाचे सूचन करते. लोकस्मृती बहुधा दुर्बळ असते. मात्र, अनिल देशमुख यांच्यावरचा आरोप कुणी ऐऱ्यागैऱ्याने केलेला नव्हता. तसे पत्र मुंबईचे तेव्हाचे पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांनी लिहिले होते. त्या पत्रात शंभर कोटी रुपये अशी रक्कमही लिहिली होती. पुढे चांदिवाल आयोगासमोर आपली ही ऐकीव माहिती होती, असे परमबीर सिंह यांनी असे म्हटले. उच्च न्यायालयाने या साक्षीची निश्चितच दखल घेतली असणार. सर्वसाधारणपणे नोकरशाही, पोलिस खाते किंवा राजकीय व्यवस्थेत कशा स्वरुपाचे व्यवहार होतात आणि काय प्रतीची संस्कृती सध्या नांदते आहे, याची कल्पना सामान्य नागरिकांनाही आहे. याचे कारण, या व्यवस्थेचा तोच पहिला बळी असतो. मात्र, ही सारी व्यवस्था दुरुस्त, स्वच्छ किंवा पारदर्शक करण्याचे प्रयत्न आणि राजकीय सूडनाट्यातील एकेक अंक आपल्या सोयीने इतरांकडून घडवून घेणे, यातला फरक करायला हवा. हे सूडनाट्य देशात पूर्वापार चालत आले आहे आणि अगदी मोठमोठ्या नेत्यांना फौजदारी खटल्यांमध्ये अडकवून त्यांचा अमानुष छळ झाल्याचीही उदाहरणे आहेत. मात्र, राजकारणाच्या खेळात पोलिस खाते किंवा सीबीआय, ईडी यांच्यासारख्या केंद्रीय यंत्रणांचा बेछूट वापर करण्यामुळे समाजाचे अनेक पदरी नुकसान होत असते. चांदिवाल आयोगाने अनिल देशमुख यांच्या विरोधात कोणताही स्पष्ट किंवा पुरेसा पुरावा मिळालेला नाही, असे म्हटले होते. मात्र, देशमुख यांना 'क्लीन चिट' देण्याचेही टाळले होते. या आयोगाचा अहवाल हा अर्थातच न्यायालयीन सुनावणी किंवा निर्णय प्रक्रियेसाठी बंधनकारक नाही. तेव्हा या किंवा इतरही प्रकरणांची तार्किक परिणती गाठायची तर न्यायालयीन सुनावणी वेगाने होऊन अंतिम निकाल लवकरात लवकर लागणे, हाच इलाज आहे. सध्या नागपुरात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन चालू आहे. तेथे अंतिम आठवडा प्रस्तावावर दीर्घ, प्रभावी भाषण करताना विधानसभेत अजित पवार यांनी अनिल देशमुख यांना जामीन मिळाल्याचा उल्लेख केला. चांदिवाल आयोगाचाही संदर्भ दिला. त्यांनी खा. संजय राऊत यांनाही अलीकडेच जामीन मिळाल्याचाही उल्लेख केला. 'प्रत्येकाच्या अंतर्मनाला माहीत असते काय केले ते..' असेही ते विरोधकांवर टीका करताना दुसऱ्या एका संदर्भात म्हणाले. अंतर्मनाला लागणारा कौल आणि न्यायव्यवस्थेतील निर्णय, यात शेवटी महत्त्वाचे काय ठरते, हे राष्ट्रवादी काँग्रेसने मुंबईत देशमुख तुरुंगातून बाहेर आल्यानंतर जो जल्लोष केला, त्यातून लक्षात येते. मुळात आता सीबीआय किंवा ईडी यांनी आपापले कणे थोडे तरी ताठ करून घेण्याची गरज आहे. आपला राजकीय वापर होऊ न देण्याची काळजी या यंत्रणांनी घेतली नाही तर त्यांची विश्वासार्हता आणखी उणावत जाईल. देशमुख यांना जामीन मिळत असताना नामचीन सचिन वाझे किंवा परमबीर सिंह यांची आठवण अनेकांना नकोशी वाटेल. मात्र, गृह खात्यात काय लायकीची माणसे होती आणि ती काय खेळ करीत होती; याची संपूर्ण नैतिक जबाबदारी गृह मंत्री आणि त्या सरकारचीच होती. आजही सरकार बदलले असले तरी तशीच माणसे आणि तीच व्यवस्था आहे. असे असताना एका आयपीएस अधिकाऱ्याच्या पत्राचे निमित्त करून एका राज्याच्या गृह मंत्र्याला कोठडीत डांबण्याचा आपला उत्साह निर्भेळ न्यायप्रिय होता की त्याला काही राजकीय रंग होते, याचे आत्मपरीक्षण केंद्रीय तपास यंत्रणांनी करावे. एखाद्या नेत्याला मिळणारा जामीन हा राजकीय सारीपटावर विजय-पराजय यांच्या तागडीत तोलला जाईल. त्याच्यावर आता डाव-प्रतिडाव टाकले जातील. मात्र, या गदारोळात काहीही आवाज नसणाऱ्या सामान्य नागरिकांच्या दृष्टीने नाटकातल्या एका अंकावर तूर्त पडदा पडला आहे.

## केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाचे सचिव मुखमित एस.भाटिया यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाचे सचिव श्री.मुखमित एस.भाटिया यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या विभागाशी संबंधित आढावा बैठक संपन्न झाली.

यावेळी रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशट्टी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, निलेश घुले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ज्योत्स्ना शिंदे,तहसिलदार विशाल दौंडकर, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सचिन इंगळी, अलिबाग मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांची उपस्थिती होती.

बैठकीपूर्वी अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाचे केंद्रीय सचिव श्री.मुखमित एस. भाटिया यांनी रायगड जिल्हा परिषद ऊर्दू शाळा, सोगाव, एसओएस हॉस्टेल, सोगाव, नगरपालिका ऊर्दू शाळा, अलिबाग, कुलाबा किल्ला येथे भेट देवून पाहणी केली. त्यावेळी त्यांच्यासमवेत उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, सोगावाचे सरपंच उपस्थित होते.

या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केंद्राच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाचे सचिव श्री.भाटिया यांना अल्पसंख्याकांसाठी जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत माहिती दिली तर तहसिलदार विशाल दौंडकर यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण माहितीविषयीचे संगणकीय सादरीकरण केले.

## थर्टीफस्टला पर्यटकाची देवकुंड, विळा, साजे, रवाळजे परिसराला मोठी पसंती

**दै.रायगड नगरी । माणगाव**

या वर्षी थर्टीफस्ट ही सर्वत्र मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येणार असून माणगांव तालुक्यातील इंदापुर, साई, मोर्बा, निजामपुर, खरवली , भिरा पाटणूस मधील देवकुंड, साजे, रवाळजे, विळा, भागाड या जंगलमय परिसरात मोठ मोठाले फार्महाऊस असून या परिसराला मुंबई, पुणे, या शहरातील तरूण पर्यटकांची मोठीया भागाला पसंती दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील मिळत असून या परिसरात पर्यटकासांठी मोठ्या प्रमाणात फार्महाऊस व तंबुची आँनलाईन बुक्कींग चालू असल्याची खात्रीशिर माहिती समजली आहे.

तसेच ३१ डिसेंबर २०२२ रोजी माणगांव तालुक्यातील काही रिसाँट हाँटेल, लाँजीग ,फार्म हाऊस ,तसेच भिरा, पाटणूस मधील देवकुंड,विळा, साजे,रवाळजे, हा जंगलमय परिसर तसेच निसर्गमय परिसरा असून या परिसरात राप्टींग होत असून नदिकाठी काही भागात फार्म हाऊस असून या फार्म हाऊसवर काही आयोजक मंडळीने थर्टीफस्ट साठी पर्यटकांची आँनलाईन बुक्कींग करून त्याना लागणारा डीजे, देशी, विदेशी, मद्याचे आयोजन देखील ते करत असल्याने या पार्ट्यांवर देखील माणगांव पोलिसांची यावेळी करडी नजर राहणार आहे. जर कुणी शासनाने लागू केलेले नियम न पाळल्यास ते पायदळी तुडवत असतील त्या व्यक्तीवर तसेच पार्ट्या आयोजकांवर हाँटेल मालकांवर कडक कारवाई केली जाईल असे माणगांव पो.नि.राजेद्र पाटील यांनी प्रतिनिधी जवळ बोलताना सांगितले.

## एस. जी. कुडेकर इंटरनॅशनल स्कूल, म्हसळा शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात आणि प्रसन्न वातावरणात संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सुरेश गजानन कुडेकर इंटरनॅशनल स्कूल, म्हसळा या शाळेच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून म्हसळा नगर पंचायतिच्या नगरसेविका राखी करंबे, नगरसेवक मुन्ना पानसरे, संस्थेचे संस्थापक सुरेश गजानन कुडेकर, सचिव श्रीम. संस्कृती सुरेश कुडेकर, संस्थेचे पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. शाहीन अन्वर गजगे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच अजय करंबे, आदित्य जोशी, संतोष कुडेकर, विशाल साळुंखे, संतोष उद्धरकर, प्रसाद बोर्ले, बाबू शिर्के, अमोल पेंढारी, अमित म्हामुणकर आणि पालक वर्ग आणि मान्यवर उपस्थित होते.

या स्नेहसंमेलात बालकलाकारांनी आपल्या नृत्य कलेतून मान्यवरांचे आणि उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली आणि प्रेक्षकांनी प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या श्रीम. राखी करंबे यांनी शाळेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुडेकर यांनी शाळेच्या सुरुवातीपासूनचा शाळेचा प्रवास वर्णन केला. आणि विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रविवार दिनांक ११ डिसेंबर, २०२२ रोजी शिपूरकर इंग्लिश स्कूल, मंगळ येथे जिल्हास्तरीय अबॅकस स्पर्धा पार पडली. या स्पर्ध्ये मध्ये आमच्या सुरेश गजानन कुडेकर इंटरनॅशनल स्कूल, म्हसळा शाळेतील सिनियर के.जी. ते ४ थी च्या वर्गातील एकूण २० विद्यार्थी स्पर्धेस सहभागी झाले होते. त्या विद्यार्थ्यांपैकी एकूण ११ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. सिनियर के.जी. मधील कुमारी शर्वरी शरद कोद्रे हिने सम्स- ॲडिशन अँड सबट्रक्शन विदाउट फॉर्मुला मध्ये सुवर्ण पदक मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तरी तिचे खूप खूप अभिनंदन.

## कर्जत मधील वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची कामगिरी; रस्त्यावरील भरले खड्डे भरून माणुकीचे दर्शन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कोणतेही सण असो की नविन वर्षाचे स्वागत चोवीस तास आपले कर्तव्य बजावत असतो तो पोलीस कर्मचारी अश्या कर्जत मधील वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी रस्त्यावरील खड्डे बुजवून रहदारीची समस्यां उदभवणार नाही, खड्ड्यामुळे अपघात होवू नये याची काळजी घेतली आणि माणुसकी दर्शन घडविले,रस्त्यावरील खड्डे भरल्याची घटना कर्जत मध्ये पाहायला मिळाली

कर्जत तालुक्याचे प्रवेशव्दार म्हणून चार फाटयाची ओळख आहे, या ठिकाणी वाहतूक पोलीस कर्मचारी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मुकुंद दरेकर, पोलीस हवालदार दिपक साटाटे,महिला पोलीस शिपाई मनाली सोनावणे, पोलीस शिपाई गणेश बो-हाडे आपली सेवा,कर्तव्य बजावत असतात, सरत्या वर्षाचा शेवटचा दिवस ३१ डिसेंबर आणि नववर्षाच्या अनुषंगाने रायगड जिह्यातील मुंबई- पुणे शहराच्या मध्यवर्ती आणि रेल्वे सेवा असलेल्या कर्जत तालुक्याला मोठ्या प्रमाणात पसंती असते, सर्वात जास्त फार्म हाऊस म्हणून कर्जत तालुक्याची ओळख आहे.

कोरोनाच्या महामारीमुळे दोन वर्षात सर्वच उत्सवावर विरजण पडले होते, परंतू सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत निर्बंधाविना असल्याने यंदाचा थर्टी फस्ट जोशात व उत्साहात साजरा केला जाणार असल्याचे चित्र दिसत आहे,कर्जत पोलीस ठाणे, आणि वाहतूक पोलीस विभाग सज्ज झाले आहेत,कर्जत तालुक्याचे प्रवेशव्दार याठिकाणी चेक पोस्ट उभारण्यात आले आहे, वाहतूक कोंडी होणार नाही याकडे वाहतूक पोलीस कर्मचारी लक्ष देत आहेत.

थर्टी फस्ट जोशात व उत्साहात साजरा करून नवं वर्षाच्या स्वागतासाठी येणा-या नागरिकांच्या वाहतूकीच्या कोंडीचे विघ्न नको म्हणून कर्जत चार फाटा येथे असणारे वाहतूक पोलीस कर्मचारी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मुकुंद दरेकर, पोलीस हवालदार दिपक साटाटे,महिला पोलीस शिपाई मनाली सोनावणे, पोलीस शिपाई गणेश बो-हाडे यांनी वैभव कन्ट्रक्शन कंपनीला विनंती करून त्यांच्या सहकार्याने चार फाटा ते मुरबाड कडे जाणा-या रस्त्यावरील रेल्वे ब्रिज व परिसरातील खड्डे सिमेंट कॉक्रीट च्या सहाय्याने भरले व माणुसकीचे दर्शन घडविले आहे. जे काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी केले पाहिजे ते काम विनंती करून वाहतूक पोलीस कर्मचारी यांनी केले आहे.



## सुधागड तालुका बौद्धजन पंचायत अध्यक्षपदी भावेश गायकवाड यांची बिनविरोध निवड

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

सुधागड तालुका बौद्धजन पंचायत ही सुधागड तालुक्यात धार्मिक संस्था म्हणून काम करीत आहे या संस्थेने तालुक्यात विस्तारित काम व्हावे या करीता तालुक्यात एकूण ८ ग्रुप तयार केले असून ८ नंबर ग्रुप मध्ये परळी , भीमनगर, समतानगर, दहीगाव, नानोसे,घोटवडे,हातोंड, चंदरगाव, वासुंडे ही गावे येतात या ग्रुप ची दर तीन वर्षांनी नव्याने कार्यकारिणी निवडण्यात येते.

दि. ३० रोजी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संस्थेचे जेष्ठ बौध्दाचार्य नारायण जाधव, सहनिवडणूक अधीकारी अमित गायकवाड यांच्या उपस्थितीत पार पडली या वेळी अध्यक्ष म्हणून भावेश गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली तसेच उपाध्यक्ष सुशील सुनील गायकवाड, चिटणीस प्रमोद गायकवाड, सहसचिव भागवत गायकवाड ,सल्लागार पंडित गणपत वाघमारे यांची निवड करण्यात आली या निवडणुकी प्रक्रिये साठी तालुका अध्यक्ष भगवान शिंदे, सचिव राजेश गायकवाड, नुतन शिंदे, अशोक वाघमारे, चंद्रकांत साळुंखे, के.टी. गायकवाड, सुनील गायकवाड , महादु ओव्हाळ, एल.डी शिंदे, निशांत पवार, मारूती साळुंखे, भिम महाडीक , दिलीप मोरे, राहुल गायकवाड अदी उपस्थित होते.

## ज्येष्ठांना सन्मान, महिलांना सुरक्षा आणि तरुणांना रोजगार देणारे राज्य : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र हे ज्येष्ठांना जपणारे, सन्मान देणारे राज्य आहे. महिलांना सुरक्षा आणि तरुणांना रोजगार देणारे आहे. शासनाची भूमिका याच पदपथावर वाटचाल करणारी आहे. या हिवाळी अधिवेशनात राज्यातील सर्वांगीण प्रगतीसाठी सर्व घटकांच्या विकासासाठीचे निर्णय घेतले. समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी सर्वांनी साथ देऊन प्रगतीच्या महामार्गावर आपल्या राज्याला नेऊया, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केले.

विधानसभेत आज अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तपशीलवार उत्तर दिले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यात गेल्या सहा महिन्यात राज्यातील विविध घटकांसाठी घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती दिली. विदर्भ विकासासाठी घेण्यात आलेले निर्णय, युवक, महिला, शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती यावेळी त्यांनी दिली.

नागपुरात झालेल्या या अधिवेशनात विदर्भासह राज्यातील जनतेला न्याय देण्याचे काम केले आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, विदर्भाच्या सर्वांगीण विकासाची भूमिका आम्ही मांडली. विदर्भ मजबूत तर राज्य मजबूत ही राज्य शासनाची भूमिका आहे. याच भूमिकेतून या भागातील प्रकल्पांना गती देण्याचे काम करीत आहोत. राज्य शासनाच्या कामाचा वेग जनतेने पाहिला असल्याचे त्यांनी नमूद केले. कमी कालावधीत नागरिकांच्या हिताचे सर्वाधिक निर्णय राज्य शासनाने घेतल्याची माहिती त्यांनी दिली.


### जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सिडको संचिका क्र.१५३९ प्रमाणे मौजे : द्रोणागिरी नोड येथे सेक्टर क्र.५६, भूखंड क्रं.५७, क्षेत्र १९९.९४ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा श्री.प्रशांत हर्षदभाई गांधी रा.१०५, पटेल शॉपिंग सेंटर, बी विंग, चंदा वर्कर लॅन्ड, बोरीवली, मुंबई यांचे नावे त्रिपक्षीय करार नोंदणी क्रमांक १८६६/२०१० अन्वये मालकी हक्क प्राप्त झालेला आहे.

श्री.प्रशांत हर्षदभाई गांधी यांनी त्यांचे मालकीचा सिडको संचिका क्र.१५३९ प्रमाणे मौजे : द्रोणागिरी नोड येथे सेक्टर क्र.५६, भूखंड क्रं.५७, क्षेत्र १९९.९४ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा आमचे अशिल यांस कायमस्वरुपी विक्री करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाबाबत आमचे अशिल हे सिडको कार्यालयात त्रिपक्षीय कराराने भूखंड हस्तांतरण करण्यात येणार आहे. तरी कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारापासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि सदर भूखंडाबाबत आमचे अशिल हे सिडकोसोबत त्रिपक्षीय कराराने आपल्या नावे भूखंड हस्तांतरण करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत असेल असे मानण्यात येईल.

दि.३०/१२/२०२२

सही/-
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री प्रेरणा अर्पा., उरण, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९७०२२०९११४**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी या जमिनीचे सध्याचे मालक श्रीमती.विठाबाई कृष्णा म्हात्रे, गंगाबाई धनाजी नाईक, नागुबाई नारायण म्हात्रे, मधुकर अर्जुन भोईर, चंद्राबाई शांताराम कदम, जयवंत अर्जुन भोईर, संजय अर्जुन भोईर सर्व रा.विंधणे, उरण, रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार |
|---|---|---|---|
| ४९ | १० | ०-१५-०० | २.०० |

वरील वर्णनाची शेतजमीन मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी रस्ता, पाणी येण्या-जाण्याचा रस्ता अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यासंबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी कागदपत्रांच्या स्वरुपात स्वतःहून हजर होवून आमचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कळवावे. वरील मुदतीत कोणीही कसलीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही असे समजण्यात येईल किंवा असल्यास तो हक्क व हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार, याची नोंद घ्यावी.

दि.३१/१२/२०२२
स्थळ : उरण

सही/-
**ॲड.अभिषेक द. म्हात्रे**
**रा.सुरुंगपाडा, ता.उरण, जि.रायगड**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी १) श्रीमती.राधाबाई भास्कर पाटील, २) श्री.प्रदीप भास्कर घरत, ३) श्रीमती.माई भास्कर घरत, ४) श्रीमती.ताई भास्कर घरत, ५) श्रीमती.वनिता सत्यकांत घरत, ६) श्रीमती.अमृता सत्यकांत घरत आणि ७) श्री.अजय सत्यकांत घरत, यांच्या सामाईक मालकी वहिवाटीची मौजे : विंधणे, ता.उरण येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेली जमीन मिळकत आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ११५ | ४ | ०-०२-०० | ०.०३ |

वर नमूद केलेली मिळकत व सदर मिळकतींमधील सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतीचे मालक १) श्रीमती.राधाबाई भास्कर घरत, २) श्री.प्रदीप भास्कर घरत, ३) श्रीमती.माई भास्कर घरत, ४) श्रीमती.ताई भास्कर घरत, ५) श्रीमती.वनिता सत्यकांत घरत, ६) श्रीमती.अमृता सत्यकांत घरत आणि ७) श्री.अजय सत्यकांत घरत, यांच्याकडून आमचे अशिल १) श्रीमती.विजयलक्ष्मी विवेक अय्यर आणि २) श्रीमती.वेधवल्ली व्ही. अय्यर यांनी कायमस्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे. यांनी कायमस्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे अगर त्याचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत आमच्या वरीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १) श्रीमती.राधाबाई भास्कर घरत, २) श्री.प्रदीप भास्कर घरत, ३) श्रीमती.माई भास्कर घरत, ४) श्रीमती.ताई भास्कर घरत, ५) श्रीमती.वनिता सत्यकांत घरत, ६) श्रीमती.अमृता सत्यकांत घरत आणि ७) श्री.अजय सत्यकांत घरत, यांचे मालकी हक्क-हितसंबध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.३०/१२/२०२२

सही/-
**श्री.विशाल अनंत मुंडकर, ॲडव्होकेट**
**शॉप क्र.२, पवन को.ऑप.हौसिंग सोसायटी, कै.रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टा समोर, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पानटपरीवर दारू विक्री; पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहत परिसरात असलेल्या पानटपरीवर सुद्धा बेकायदेशीर रित्या दारू विक्री होण्याच्या घटनेमध्ये वाढ झाली आहे.

कळंबोली पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात रोडपाली येथे चक्क पानटपरीवरही दारू विक्री केली जात होती. याची माहिती मिळाल्यानंतर विशेष पोलीस पथकाने छापा टाकून दारूसाठा जप्त करून संबंधितावर गुन्हा दाखल केला आहे.

## श्रमिक विद्यालय चिल्हे येथे क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न करण्यात आला.

संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या हस्ते सर्वप्रथम क्रीडाज्योतीचे प्रज्वलन करून व श्रीफळ वाढवून या महोत्सवास प्रारंभ करण्यात आला.यावैळी सचिव धोंडू कचरे, संचालक प्रकाश थिटे,धनाजी लोखंडे,विजय पवार,गजानन भोईर, मुख्याध्यापक दिपक जगताप, नरेंद्र माळी आदी प्रमुख मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या यहोत्सवातंर्गत विद्यार्थी वर्गाच्या सांघिक तसेच वैयक्तिक खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.तर शेवटच्या सत्रात विविध फनीगेम्स घेऊन या महोत्सवाची सांगता करण्यात आली.या महोत्सवाचे यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले.



# माणगाव शहरातील वाहतूक कोंडीमुळे वाहन चालक व पर्यटक हैराण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

मुंबई - गोवा महामार्गावरील माणगाव हे महत्त्वाचे शहर असून सततच्या वाहतूक कोंडीमुळे वाहन चालक व पर्यटक हैराण झाले असून नेहमी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे पोलीस प्रशासन देखील हतबल झाले आहे. पर्यटकांना मोठी कसरत करत आपली वाहने घेऊन जावी लागतात.



वर्ष अखेरीस डिसेंबर महिना, रविवार, तसेच दर शनिवार, रविवारी पुणे, ठाणे, मुंबई या मोठ्या शहरातून पर्यटनासाठी येणारे पर्यटक कोकणातील आकर्षणामुळे मोठी गर्दी करतात. नवीन वर्ष साजरा करण्यासाठी पर्यटक कोकणात येत असल्यामुळे काल ३० डिसेंबरला तर महामार्गावर पाच ते सहा कि.मी. अंतरावर वाहनाच्या लांबच लांब रांगा होत्या. त्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली होती. प्रवाशी व लहान मुले या प्रकारामुळे हैराण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. माण-गाव शहरातून पर्यटकांना पुणे, महाड, रायगड, श्रीवर्धन, महाबळेश्वर या ठिकाणी जावे लागते त्यामुळे माणगाव हे जंक्शन झाले आहे. पुणे भागातून ताम्हिणी मार्गे माणगावला येण्यासाठी पर्यटकांना जवळचा मार्ग असल्यामुळे घाट माथ्यावरून मोठ्या प्रमाणात पर्यटक कोकणात येतात. तसेच दिघी - पुणे महामार्ग मानगाव शहरातून जात असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहनाची रहदारी सुरू असते.

अनेक वाहन चालक बेदरकारपणे वाहतुकीचे नियम तोडून आपली वाहने चालत असतात तर काही वाहन चालक चुकीच्या पद्धतीने वाहनांची बाजू काढून पुढे जात असतात. त्यामुळे अनेकदा अपघात होतात आणि अपघात झाला तर वा-हतूक पूर्णपणे ठप्प होते. माणगाव शहराबाहेरून जाणाऱ्या बायपास या मार्गाचे काम पूर्णपणे ठप्प आहे. राजकीय नेते याबाबतीत मुग मिळून आहेत. त्यांच्या या नाकर्तेपणामुळेच महामार्गाचे काम रखडले असून याचा फटका पर्यटकांना व सामान्य माणसांना प्रवास करताना सहन करावा लागतो. माणगाव शहरात रस्त्यावरील अनधिकृत पणे लावलेल्या फळांच्या व विविध प्रकारच्या सामानांच्या हात गाड्या तसेच कुठेही बाजारपेठेत पार्किंग करून ठेवलेली वाहने यामुळे देखील शहरात सतत वाहतूक कोंडी होत असते. पोलीस व नगरपंचायतीने मनावर आणले तर शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवू शकतात. पण करणार कोण? वाईटपणा घेणार कोण? यामुळे माणगावचे नाव सतत वाहतूक कोंडीमुळे चर्चेत असते.

शहरातील सततच्या वाहतूक कोंडीमुळे पोलीसही हैराण झाले असून पोलिसांवरील ताण वाढला आहे. तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक शनिवार, रविवारी माणगाव शहरात येण्यासाठी घाबरतात. कारण पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडावा लागतो. महामार्गावरील गारळ फाटा ते खरवली फाटा असे पाच ते सहा कि.मी. वाहनांच्या रांगा लागलेल्या दिसतात. महाबळेश्वर येथून पर्यटक मुंबई, पुणे येथे जाण्यासाठी येतात पण माणगाव शहर पार करताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. कारण दोन-तीन तासानंतर शहरातून बाहेर पडावे लागते म्हणून वाहतूक कोंडीमुळे वाहन चालक व पर्यटकांची सुटका कशी होईल याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी प्रवासी करत आहेत. नवीन वर्ष साजरा करण्यासाठी आलेल्या पर्यटकांना मात्र वाहतूक कोंडीचा जबर फटका बसला आहे.

## घोणसे येथे कारला अपघात

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

माणगाव- दिघी या रस्त्यावरील अपघातांची मालिका सुरू असताना शहापूर (ठाणा) हुन दिवेआगर(श्रीवर्धन) येथे जाणाऱ्या पर्यटकांची चक४८-७९३२ ही स्विफ्ट डीझायर गाडी घोणसेजवळ ३ कोलांट्या मारुन रस्त्याचे बाजूला गेली राष्ट्रीय महामार्गावर पडलेल्या खडीमुळे सायं ५चे दरम्यान सदरचा अपघात झाला. भरधाव असणाऱ्या या कारने तीन कोलांट्या मारूनअपघात झाला असे सतकृत दर्शनी अपघात पहाणाऱ्यांनी सांगितले. अपघातात कार मधील १) रंजना रविंद्र पाटील वय ६० २) राज रविंद्र पितांबरे वय५ ३) विर रविंद्र पितांबरे वय ७ ४) प्रियांका रविंद्र पितांबरे वय ३५ ५) रवींद्र घोंडू पाटील वय ५० ६) रवींद्र पितांबरे वय ४५ सर्व रा. शहापूर जि. ठाणे त्यांच्यावर ग्रा. रुग्णालय म्हसळा येथे डॉ. महमद रहाटवीलकर यानी उपचार करून पुढील उपचारासाठी माणगाव येथे पाठविण्यात आल्याचे समजते.



## शिवसेनेच्या माध्यमातून आदिवासी पाड्यावरील महिलांना मोफत शिलाई मशीनचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पुरस्कृत व श्रीपुष्प प्रतिष्ठान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सशक्तीकरण व स्वयंरोजगार निर्मिती कार्यक्रमा अंतर्गत आदिवासी पाडा खारघर येथील महिला सौ. रंजना मारोती वाघमारे, सौ. संध्या पारधी व कु. भारती कातकरी यांच्या नावे मोफत शिलाई मशीन वितरित करण्यात आल्या.

या प्रसंगी जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्यासह उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, महानगर समन्वयक दिपक घरत, महानगर संघटक डी. एन. मिश्रा, शिवसेना विभाग समन्वयक संजय कानडे, महिला आघाडीच्या उपजिल्हा संघटिका सौ. कल्पना पाटील, विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, तालुका संघटिका सौ. सुजाता कदम, उपतालूका संघटीका सौ. मीना सदरे, उपमहानगर संघटिका सौ. रीना पाटील, शहर संपर्क संघटीका सौ. नंदा चेडे, शहर संघटीका खारघर सौ. रुपाली कवले, अथेंटीक कडमी च्या सौ. सुनिता फडतरे, सौ. मनीषा कांबळे, सौ. कल्याणी मनुगडे आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोंढरी शाळेची विजय पताका

**दै.रायगड नगरी । उरण**

नुकताच उरण येथे संपन्न झालेल्या २२ व्या द्रोणागिरी युवा महोत्सवात रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोंढरीच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात सहभागी होऊन तब्बल १३ पदके जिंकून उरण तालुक्यातील कोंढरी शाळेचे नाव लौकिक वाढवले आहे. या उत्तम कार्यामुळे कोंढरी शाळेचे सर्वच स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. कोंढरी शाळेचे मुख्याध्यापक , सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती कोंढरी यांच्या विशेष सहकार्य व मार्गदर्शना मुळे हे यश मिळाले आहे. यशाचे मानकरी १)दिशा भगत - चित्रकला स्पर्धा व्दितीय क्रमांक २)कौशल पाटील- वेशभूषा स्पर्धा प्रथम क्रमांक ३) विंदा कोळी - वेशभूषा स्पर्धा व्दितीय क्रमांक ४)दिव्य ठाकूर- निबंध स्पधा तृतीय क्रमांक ५) वेदिका ठाकूर- रांगोळी स्पर्धा तृतीय स्पर्धा ६)लारा भोईर- हस्ताक्षर व्दितीय क्रमांक आणि वक्तृत्व स्पर्धा व्दितीय क्रमांक ७) हेतल पांचाळ - हस्ताक्षर स्पर्धा प्रथम क्रमांक (मोठागट) वक्तृत्व स्पर्धा - तृतीय क्रमांक पोस्टर मेकिंग- व्दितीय क्रमांक निबंध - तृतीय क्रमांक ८)तनिष्का पाटील- वक्तृत्व स्पर्धा प्रथम (मोठागट) निबंध स्पर्धा - प्रथम या सर्व विजयी उमेदवारांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## चिरनेर हायस्कूल येथे स्नेहसंमेलनाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनिल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी.खारपाटील एज्यूकेशन सोसायटीच्या हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनिल पाटील यांनी संस्थेचे अध्यक्ष पी.पी.खारपाटील यांच्या प्रमुख उपस्थीतीत दिप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, पंचायत समितीच्या माजी उपसभापती शुभांगी पाटील,जिल्हा परिषद माजी पक्ष प्रतोद बाजीराव परदेशी, शिव-सेना तालुका प्रमुख संतोष ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी राबविलेल्या रांगोळी प्रदर्शन, चित्रकला प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन, क्राफ्ट प्रदर्शन, हस्तकला प्रदर्शनाचे उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमार्फत तयार केलेल्या मनमोहक कलाकृती पाहून मान्यवर पाहूणे भारावून गेले. यावेळी बोलताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील यांनी पोलिसांच जीवन व काम याबद्दल विद्यार्थ्यांना माहीती दिली. व विद्यार्थी दशेपासूनच आयुष्यात ध्येय बाळगून वाटचाल करायला हवी असा कानमंत्र विद्यार्थ्यांना दिला.

तर संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त मोबाईल पासून दूर रहायला हवे व अभ्यासाकडे लक्ष द्यायला हवे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी अभ्यासातून यश प्राप्त करत स्वत:चे आपल्या आई वडीलांचे, शाळेचे, गावाचे नाव जागतीक पातळीवर चमकवायला हवे, या स्नेहसंमेलनाला संस्थेच्या सदस्या वर्षा खारपाटील, सुनिता खारपाटील व अर्चना ठाकूर, व्हा. चेअरमन सागर खारपाटील, शेकाप चिटणीस सुरेश पाटील, तंटामूक्ती अध्यक्ष अलंकार परदेशी, माजी सरपंच पद्माकर फोफेरकर, ग्रा. सदस्य रमेश फोफेरकर, आदी मान्यवर उपस्थीत होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी १) श्री.दिपक दामा डाकी आणि २) श्रीमती.दमयंती दामा डाकी, यांच्या सामाईक मालकी वहिवाटीची मौजे : विंधणे, ता.उरण येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेली जमीन मिळकत आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | १४० | २ | ०-३९-०० | १.८७ |

वर नमूद संपूर्ण मिळकती मधील श्री.दिपक दामा डाकी, आणि २ श्रीमती.दमयंती दामा डाकी यांच्या सामाईक मालकी वहिवाटीची ० हे-१६ आर. ०० पॉ.आकार ० रु.७७ पै. (१६ गुंठे) ही जमीन मिळकत सदर जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमूद केलेली मिळकत व सदर मिळकतींमधील सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतीचे मालक १) श्री.दिपक दामा डाकी, आणि २) श्रीमती.दमयंती दामा डाकी, यांच्याकडून आमचे अशिल १) श्री.सुप्रियो रंजन गांगुली, २) श्रीमती.श्रेया गांगुली, ३) श्रीमती. सोलांकी सेनगुप्ता आणि ४) श्री.सुरज यशवंत दैत यांनी कायमस्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे अगर त्याचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत आमच्या वरीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १) श्री.दिपक दामा डाकी आणि २) श्रीमती.दमयंती दामा डाकी यांचे मालकी हक्क-हितसंबध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल

दि.३०/१२/२०२२

सही/-

**श्री.विशाल अनंत मुंडकर, अॅडव्होकेट**

**शॉप क्र.२, पवन को.ऑप.हौसिंग सोसायटी, कै.रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टा समोर, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**



Sonawane Judge

Adv. V. A. Mathew

Adv. Somnath M. Gaikwad

Adv for the Applicant

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF DISTRICT AND SESSIONS COURTS PANVEL, AT PANVEL

CIVIL M.A.NO. 1760 OF 2022

Exh No.7/D

Next Date : 17/01/2023

Mrs.Elizabeth Mary D'eruz Petitioner

V/S

Nil

(Deceased is husband of the Petitioner)

**IN THE MATER OF HEIRSHIP CERTIFICATE OF THE DECEASED MR.LAMBERT EDMUND D'CRUZ WHO EXPIRED ON 23-03-2018 AT MAHIM, MUMBAI**

WHEREAS the above named deceased MR.LAMBERT EDMUND D'CRUZ owned the following properties listed below :

| SR.NO. | DESCRIPTION OF PROPERTIES |
|---|---|
| 1 | Mayflower Co-Opertive Housing Society Ltd, Godrej Sky Garden, Takka Village, Panvel, Dist-Raigad-410206, Flat No.9, 2nd Floor. |

The Applicant here in above named has filed the above said Application for issuing "HEIRSHIP CERTIFICATE" in her favour submitting that there is nobody else being claimant/s upon the said property listed above. Notice is hereby issued that if anybody is having any claim upon the said immovable properties they are hereby called upon approach the office of the Hon'ble Court within 30 days (THIRTY DAYS) of publication of this notice.

Place : Panvel

Date : 21/12/2022

Sd/- Jr.Clerk Civil Judge (S.D.) Panvel

Court Seal

Sd/- Asst.Superitent Civil Judge (S.D.) Panvel



### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the Public at large that our clients, M/s Alliance Infra, a duly constituted Partnership Firm with offices at Ghansoli, Navi Mumbai – 400 701, as represented by its Partners, Shri. Vishal Ramesh Patil and 04 Others, are planning to purchase Plot No. 28+29+30+41+42+43, , Sector 9, Airoli, Navi Mumbai, District Thane, admeasuring 549.85 square metres originally allotted by CIDCO Ltd under the 12.5% Scheme to the Late Shri Laxman Bama Madhavi, under File No. Dive-7 vide Agreement to Lease dated 29 January 1998, from his Legal Heirs – 1) Late Shri Abhimanyu Laxman Madhavi, represented by 1.1) Shri Ankush Abhimanyu Madhavi, 1.2) Smt. Shakuntala Narayan Koli, 1.3) Shri Chandrashekhar Abhimanyu Madhavi, 1.4) Shri Namdev Abhimanyu Madhavi, and 1.5) Shri Narayan Abhimanyu Madhavi; 2) Shri Bhalachandra Laxman Madhavi; 3) Shri Baliram Laxman Madhavi; 4) Shri Bhagirath Laxman Madhavi; 5) Smt. Vatsalabai Gopinath Madhavi; 6) Shri Ravindra Gopinath Madhavi; 7) Smt. Kaminibai Kashinath Patil; 8) Late Shri Kacher Balaji Madhavi, represented by 8.1) Smt. Shaila Kacher Madhavi, 8.2) Smt. Amruta Milind Tandel, and 8.3) Smt. Darpana Sandip Tandel; 9) Shri Dattatrya Balaji Madhavi; and 10) Shri Dinanath Balaji Madhavi, all adults, r/o Dive Gaon, Airoli, Thane. Our clients shall be executing a Tripartite Agreement with CIDCO Ltd and the Legal Heirs of the Late Shri Laxman Bama Madhavi, in respect of the above-described plot, after publication of this Public Notice and after completing the due procedures.

Any person having any claim, rights, title, interest, ownership and/or any demand in the plot described above, by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust, maintenance, inheritance, possession, lease, easement, occupation, lien or howsoever otherwise, are hereby requested to make the same known to the undersigned herein below, within a period of 15 days from the publication of this Public Notice, failing which the claims of any such person shall be deemed to have been waived off and / or finally abandoned.

Dated: 30 December 2022

Sd/-

**M/s. Vashi Advocates**

Office No. 528, The Commodity Exchange, Plot No. 2,3 & 4, Sector 19, Vashi, Navi Mumbai- 400709

Email: vashiadvocates@hotmail.com

Mob: +91 93216 65960



### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the Public at large that our clients, M/s Alliance Infra, a duly constituted Partnership Firm with offices at Ghansoli, Navi Mumbai – 400 701, as represented by its Partners, Shri. Vishal Ramesh Patil and 04 Others, are planning to purchase Plot No. A-27+28, Sector 9, Airoli, Navi Mumbai, District Thane, admeasuring 485.23 square metres, originally allotted by CIDCO Ltd under the 12.5% Scheme to the Late Shri Laxman Bama Madhavi, under File No. Dive-7 vide Agreement to Lease dated 29 January 1998, from his Legal Heirs – 1) Late Shri Abhimanyu Laxman Madhavi, represented by 1.1) Shri Ankush Abhimanyu Madhavi, 1.2) Smt. Shakuntala Narayan Koli, 1.3) Shri Chandrashekhar Abhimanyu Madhavi, 1.4) Shri Namdev Abhimanyu Madhavi, and 1.5) Shri Narayan Abhimanyu Madhavi; 2) Shri Bhalachandra Laxman Madhavi; 3) Shri Baliram Laxman Madhavi; 4) Shri Bhagirath Laxman Madhavi; 5) Smt. Vatsalabai Gopinath Madhavi; 6) Shri Ravindra Gopinath Madhavi; 7) Smt. Kaminibai Kashinath Patil; 8) Late Shri Kacher Balaji Madhavi, represented by 8.1) Smt. Shaila Kacher Madhavi, 8.2) Smt. Amruta Milind Tandel, and 8.3) Smt. Darpana Sandip Tandel; 9) Shri Dattatrya Balaji Madhavi; and 10) Shri Dinanath Balaji Madhavi, all adults, r/o Dive Gaon, Airoli, Thane. Our clients shall be executing a Tripartite Agreement with CIDCO Ltd and the Legal Heirs of the Late Shri Laxman Bama Madhavi, in respect of the above-described plot, after publication of this Public Notice and after completing the due procedures.

Any person having any claim, rights, title, interest, ownership and/or any demand in the plot described above, by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust, maintenance, inheritance, possession, lease, easement, occupation, lien or howsoever otherwise, are hereby requested to make the same known to the undersigned herein below, within a period of 15 days from the publication of this Public Notice, failing which the claims of any such person shall be deemed to have been waived off and / or finally abandoned.

Dated: 30 December 2022

Sd/-

**M/s. Vashi Advocates**

Office No. 528, The Commodity Exchange, Plot No. 2,3 & 4, Sector 19, Vashi, Navi Mumbai- 400709

Email: vashiadvocates@hotmail.com

Mob: +91 93216 65960

## संक्षिप्त...

### चौदा वर्षीय मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शाळेत जाताना चौदा वर्षीय मुलीचे अपहरण झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सदर मुलगी वावंजे येथील शाळेत जाते वेळी तिला अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेले. तिचा रंग सावळा, अंगाने मध्यम, उंची पाच फूट आहे. तिने अंगात लाल रंगाचा फुल पंजाबी ड्रेस घातला असून सोबत मोबाइल आहे. तिचे अपहरण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रायगड जिल्हा सेवादळ अध्यक्षपदी कमलाकर घरत तर उरण तालुका सेवादल अध्यक्षपदी गोपीनाथ मांडेलकर

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या आदेशानुसार.रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी आज रायगड जिल्हा काँग्रेस सेवादल अध्यक्षपदी नविनशेवे गावचे कमलाकर घरत यांची नियुक्ती केली. तर उरण तालुका काँग्रेस सेवादल अध्यक्षपदी माजी चाणजे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष गोपीनाथ मांडेलकर यांची नियुक्ती केली आहे. शेलघर येथील जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या सुखःकर्ता बंगलो निवास ऑफिस मध्ये सदर निवडीचे पत्र त्यांना देण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष किरिट पाटील, उरण तालुका इंटक चे अध्यक्ष संजय ठाकूर,काँग्रेसचे जेष्ठ नेते. के.डी कोळी, उरण विधानसभा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष. लंकेश ठाकूर, उरण तालुका अध्यक्ष आदित्य घरत, आनंद ठाकूर, विवेक म्हात्रे. यावेळी उपस्थित होते.

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी माथेरानमध्ये पर्यटकांची मांदियाळी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

पर्यटकांचे आवडते प्रदूषणमुक्त, गारे-गार, अल्हाददायक पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये नाताळ व नववर्षाच्या स्वागतासाठी येथे आज पासून पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळणार आहे. कोरोना काळानंतर पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात पर्यटक माथेरान मध्ये दाखल झाले आहेत.



मुंबई-पुण्यापासून हाकेच्या अंतरावर असल्याने लाखो पर्यटक माथेरानला भेट देतात. कोरोना काळात माथेरान एकदम सुन्न होते. कोरोना नंतर माथेरान पर्यटकांसाठी खुले करण्यात आले तेव्हापासून खूप कमी प्रमाणात पर्यटक येत होते. मात्र यावर्षी दिवाळी आणि नाताळच्या सुट्ट्यांमध्ये पर्यटकांची संख्या वाढली आहे. यावर्षीच्या नववर्षाच्या स्वागतासाठी आज शुक्रवार पासून माथेरान मध्ये पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळणार आहे. अनेक हॉटेल्स व लॉज मध्ये पर्यटकांनी अगोदर पासूनच रूम बुक केले आहेत. पर्यटकाना प्रवासात कोणताही त्रास होऊ नये यासाठी मिनिट्रेन सेवे बरोबरच नव्याने सुरू झालेली ई-रिक्षाची सेवा देखील सुरळीत सुरू आहे. नेहमी वाहनतळावर पार्किंग व्यवस्था गंभीर असायची मात्र यावेळेला वन विभागामार्फत, वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, वनपाल रामकुमार आडे, नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांनी नियोजनबद्ध काम केल्याने येणाऱ्या पर्यटकांना वाहनतळात कोणताही समस्या भेडसावताना दिसणार नाही. येणाऱ्या पर्यटकांच्या सेवेसाठी व्यावसायिक सुद्धा आपली दुकाने सज्ज करून तयार आहे.

यावेळेला पाच महिने पाऊस पडल्यामुळे वातावरण अगदी आल्हाददायक झाले आहे. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून माथेरानमध्ये गुलाबी थंडी जाणवू लागली. हळूहळू तापमनात घट होताना जाणवत आहे. त्यामुळे येथे या शेवटच्या आठवड्यात आलेल्या पर्यटकांना गुलाबी थंडीचा आनंद घेता येणार आहे. माथेरान मध्ये नाताळ व नववर्षाच्या स्वागतासाठी येथील हॉटेल व्यवस्थापनाने पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आपआपल्या हॉटेल्स मध्ये रंगीबेरंगी आकर्षक विद्युत रोषणाई केलेली पहावयास मिळत आहे.काही हॉटेल व्यवस्थापनाने केकची व्यवस्था सुद्धा केलेली आहे.

# नुतन वर्ष व नाताळ निमित्त सुहित जीवन ट्रस्टच्या गतिमंद विद्यार्थ्यांना मॅकडोनाल्ड तर्फे पार्टी

**दै.रायगड नगरी । पेण**

पेणच्या सुहित जीवन ट्रस्ट या बौध्दिक अक्षम मुलांच्या संस्थेमध्ये दरवर्षी ख्रिसमस व नूतन वर्षाची पार्टी मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी केली जाते. मात्र यावर्षी पनवेल येथील ओरायन मॉल मधील मॅकडोनाल्डच्या खास आग्रहास्तव नाताळ व नुतन वर्षानिमित्त गतिमंद विद्यार्थ्यांसोबत आज पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मॅकडोनाल्डच्या सर्व कर्मचाऱ्यांनी गतिमंद मुलांसोबत अतिशय उत्साहात पार्टी साजरी केली.



या पार्टीला सुहित जीवन ट्रस्ट संस्थेचे विद्यार्थी, शिक्षक, विश्वस्त तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी मॅकडोनाल्डसच्या सर्व कर्मचाऱ्यांनी सुंदर सजावट करून अत्यंत जिव्हाळ्याने संस्थेच्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांच्या तालावर सुंदर नृत्याविष्कार सादर केले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी विविध खेळ आयोजित करण्यात आले होते. जिंकलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देखील देण्यात आली. सर्व विदयार्थी व शिक्षकांना मॅकडोनाल्ड मधील विविध प्रकारचा अल्पोपहार देण्यात आला.

विद्यार्थ्यांना मॅकडोनाल्डची छोटी सफर देखील घडवण्यात आली.

मॅकडोनाल्डचे मालक व संपूर्ण स्टाफने सुद्धा विद्यार्थ्यांसोबत अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. ओरायन मॉल व मॅकडोनाल्डच्या संपूर्ण टिमकडून सर्व विद्यार्थ्यांना नूतन वर्षानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी सुहित जीवन ट्रस्ट पेणच्या अध्यक्षा डॉ.सुरेखा पाटील यांनी मॅकडोनाल्डचे आभार मानले.

### कंपनीच्या खात्यात पैसे न भरता केला ११ लाखांचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कंपनीच्या खात्यात पैसे भरून त्याची पोहच पावती आणुन देतो असे सांगुन ते पैसे कंपनीच्या खात्यामध्ये न भरता त्याचा अपहार केल्याप्रकरणी कंपनीच्या सेल्स हेडवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मनोहर चौधरी (वय ५८) यांनी इम्पेरिया प्रोजेक्ट, नेरूळ येथे ३८ लाख १८ हजार ४०० रुपये किमतीचा ५२० चौ. फुट क्षेत्राचा एक ऑफीस स्पेस बुक केला होता. या प्रोजेक्ट मधील सेल्स हेड असलेले आरोपी प्रणव सांमत याने चौधरी यांच्याशी ओळख वाढवुन त्यांच्याशी गोड बोलून त्यांचा विश्वास संपादन केला.

ऑफीस स्पेस खरेदीसाठी असणाऱ्या रकमेपैकी ११ लाख रुपये रोख रक्कम प्रणव यांनी कंपनीचे अकाउंटमध्ये भरून त्याची पोहच पावती आणुन देतो असे सांगुन हि रक्कम चौधरी यांच्याकडून स्विकारली.

मात्र प्रणवने हि रक्कम कंपनीचे अकाउंटवर न भरता स्वतःचे आर्थीक फायद्यासाठी सदर रकमेचा अपहार केला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात जिल्ह्यातील युवक-युवतींनी सहभाग घ्यावा : रविंद्र नाईक

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या वतीने रायगड जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन रविवार, दि.०१ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०.०० वा. सी के ठाकूर महाविद्यालय, खांदा कॉलनी, पनवेल येथे करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या युवक कल्याण विभागाच्या वतीने राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

त्यापूर्वी राज्यस्तरीय युवा महोत्साचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात येते. राज्यस्तरीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी रायगड जिल्ह्याचे युवक- युव-तींना या युवा महोत्सवामधून मिळणार आहे.

या युवा महोत्सवामध्ये लोकगीत व लोकनृत्य या कला बाबींचा समावेश राहील. लोकगीत मध्ये सहभागी होणाऱ्या संघामध्ये साथसंगतसह १० कलाकार सहभागी होऊ शकतील, सादरीकरणासाठी त्यांना ०७ मि. वेळ देण्यात येईल. लोकनृत्य मध्ये सहभागी होणाऱ्या संघामध्ये साथसंगतसह २० कलाकार सहभागी होऊ शकतील, सादरीकरणासाठी त्यांना १५ मि.वेळ देण्यात येईल.

सर्व युवक-युवतींचे वय १५ ते २९ वर्ष असणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांचा जन्म दि.१२ जानेवारी १९९४ ते १२ जानेवारी २००८ या कालावधीत झालेला असावा. स्पर्धा ठिकाणी संघांची प्रवेशिका भरुन सादर करावी लागेल.

तसेच स्पर्धेसाठी येतांना आधार कार्ड/ जन्म तारखेचा दाखला/बोर्ड प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र यापैकी एक कादगपत्र जोडणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी श्री सचिन निकम क्रीडा अधिकारी यांचेशी मो.क्र.८८५६०९३६०८ येथे संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त संघांनी, महाविद्यालयांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.रविंद्र नाईक यांनी केले आहे.

# मुरुडमध्ये बुरुड समाजाचा वर्धापन दिन संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुका बुरुड समाज या संस्थेचा ४२ वा.वर्धापन दिन रविवार दि.२५ डिसेंबर रोजी कुंभार वाड्यातील गावदेवी जरीमाता सामाजिक सभागृहात बुरुड समाजाचे रायगड जिल्हाध्यक्ष रुपेश जामकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका अध्यक्ष अशोक करंबत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.





रायगड जिल्हा बुरुड समाज महिला आघाडी अध्यक्षा सिद्धीताई मोरे ,बरुड समाज कोकण विभाग अध्यक्ष सुदीन सावंत,रायगड जिल्हा बुरुड समाजाचे माजी अध्यक्ष राजेश मोरे, राजेश खैरे,कोकण विभाग बुरुड समाजाचे माजी अध्यक्ष संदेश नागे, बुरुड समाजाचे तालुका अध्यक्ष अशोक करंबत, माजी अध्यक्ष सुधीर नागे, उपाध्यक्ष दिपक तेलंगे, राकेश किल्लेकर, सचीव नंदकुमार सोनकर, सहसचिव सुजन खैरे, खजीनदार महेंद्र सोनकर, सल्लागार दिलिप जामकर, उदय किल्लेकर, उपखजीनदार विजय महाले, हिशेब तपासनीस द्वारकानाथ गायकवाड, विभाग प्रमुख महेश जामकर (मुरुड शहर), महेश साळुंखे(साळाव), मनोहर किल्लेकर (बोर्ली), निलेश गायकवाड (मजगांव), संध्या नागे, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांसह समाज बांधव उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून संध्या नागे व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने करण्यात आली.

मुरुड तालुका बुरुड समाजाचे सचिव नंदकुमार सोनकर यांनी प्रास्ताविक केले तर समाजातील विविध समस्या अडचणी संस्थेच्या कार्याचा व भविष्यकालीन योजनेचा आढावा बुरुड समाजाचे माजी तालुका अध्यक्ष सुधीर नागे गुरुजी यांनी घेतला. यावेळी प्रमुख पाहुणे रुपेश जामकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुरुड तालुका बुरुड समाज संस्थेच्या कार्याचा गौरव करून उपस्थित समाज बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून न सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात पास झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पारितोषिक वितरण करण्यात आले.या समारंभात शालेय आणि महाविद्यालय शैक्षणिक मध्ये उत्कृष्ट गुण संपन्न करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी स्मृतिचिन्ह आणि पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

मुरुड तालुका बुरुड समाज संस्थेचे अध्यक्ष अशोक करंबत कार्याध्यक्ष राजेंद्र जामकर, जिल्हा प्रतिनिधी सुधीर नागे, सचिव नंदकुमार सोनकर महेंद्र सोनकर, दिपक तेलंगे, राकेश किल्लेकर द्वारकानाथ गायकवाड, सुजन खैरे,विजय महाले, दिलीप जामकर, उदय किल्लेकर, महेश जामकर, मयूर साळुंखे, मनोहर किल्लेकर, निलेश गायकवाड तसेच संस्थेचे गटकार्यकर्ते यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# फसव्या, भुलविणाऱ्या जाहिराती, ऑनलाइन वस्तू खरेदीतील फसवणूक बाबत ग्राहकांनी दक्ष राहिले पाहिजे : समीर घारे

## म्हसळ्यात शाळा, कॉलेजात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील न्यु इंग्लिश हायस्कूल, अंजुमन हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे म्हसळा तहसीलदार समीर घारे यांचे प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.



दरवर्षी राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा केला जातो याच औचित्याने आणि जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेशानुसार व जिल्हा पुरवठा अधिकारी रायगड यांचे मार्गदर्शनाने आयोजित राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्ताने तहसीलदार समीर घारे यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की शासकीय जीआर पत्राच्या आधारे ग्राहक संरक्षण दिन अधिनियम १९८६ अन्वये आपल्या देशाच्या सामाजिक - नि - आर्थिक कायद्यानुसार इतिहासातील एक महत्वाची घटना आहे.

ग्राहकांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या कायद्यात पुरोगामी आणि व्यापक असा कायदा आहे. असे सांगताना एखाद्या मालाची विक्री चढत्या भावाने होत असेल किंवा मालावर दर्शविलेल्या किमतीपेक्षा जास्त भावाने विक्री होत असेल तर जिल्हा पातळीवर ग्राहक तंटा निवारण यांच्याकडे तक्रार करणे आवश्यक आहे तसेच एखादे वस्तूची खरेदी करताना कर पावती घेणे आवश्यक आहे.

आपण खरेदी करीत असलेल्या मालाची क्वालिटि काय आहे, फसव्या व भुलविणाऱ्या जाहिराती, ऑनलाइन खरेदी मधील वस्तूंमध्ये होत असलेली फसवणूक याबाबत ग्राहकांनी दक्ष राहिले पाहिजे असे तहसीलदार समीर घारे यांनी सांगून उपस्थित सर्वांना राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

तसेच डॉ.मुकादम यांनी ग्राहक व त्यांची जबाबदारी तसेच जागरूकता व हक्क, निवड याविषयी विस्तृत असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचे शंकाचे निरसन केले. न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे प्रा.प्रकाश हाके यांनी ग्राहक व त्यांची जबाबदारी या विषयावर शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना त्यांचे महत्त्व या विषयी माहिती दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना अव्वल कारकून विशाल भालेकर यांनी केली.

यावेळी उपस्थितांना ग्राहकांचे हक्क व कर्तव्ये याबाबत माहिती पत्रक वाटप करण्यात आले. यावेळी सदर कार्यक्रमास तहसीलदार समीर घारे यांसह पुरवठा विभाग अव्वल कारकून विशाल भालेकर, प्रा.प्रकाश हाके, डॉ.मुकादम यांसह शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

### गोडावूनमधील पत्राचे शेड उचकटून ८० हजाराचे माल लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील पळस्पे येथील एका गोडावून मधील पत्राचे शेडचे पत्रा उचकटून आत प्रवेश करून अज्ञात इसमाने ८० हजार रुपयांचे माल चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पळस्पे येथील मॅरॅथॉन नेक्झॉन येथील कंपनीच्या गोडावूनचे पत्राचे शेडचा पत्रा उचकटून आत मध्ये प्रवेश करून एका अज्ञात इसमाने गोडावून मध्ये ठेवलेले मायवानच्या त्रिकोणी आकाराच्या ९५ प्लेट ज्याची किंमत सुमारे ८० हजार रुपये इतकी आहे ती चोरून नेली.

यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# पोस्को कंपनीतर्फे वनवासी कल्याण आश्रमशाळेस १२० बंक बेड आणि २४० गाद्यांची मदत



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

पॉस्को महाराष्ट्र स्टील मल्टीनॅशनल कंपनीने आपल्या सी. एस. आर. उपक्रमांतर्गत वनवासी कल्याण आश्रम शाळा माणगांवच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी दि. २२ डिसेंबर २०२२ रोजी १२० बंक बेड (खाटा) आणि २४० गाद्यांची भेट स्वरूपात दिले. सदर बंक बेड हे उच्च प्रतीचे व त्यांस प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचे वैयक्तिक साहित्य ठेवण्यासाठी स्वतंत्र असे ड्रॉवर ची सुविधा असलेले तसेच स्लीपवेल कंपनीच्या गाद्या आहेत. वनवासी कल्याण आश्रम शाळा हि एक सेवाभावी संस्था आहे, वनवासींच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतीक विकासासाठी समाजाच्या दानशूर दात्यांच्या माध्यमातून संस्था अविरत सेवा करत आहे. या आश्रम शाळेतील विद्यार्थी सध्या खाली लाद्यांवरती झोपत होते. येथे बेड ची कोणतीही सुविधा नव्हती, ही विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन पोस्को कंपनीने बंक बेड देण्याचे ठरवले.

कंपनीने केलेल्या मदतीबद्दल शाळेचे व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. काही दिवसापूर्वीच पोस्को कंपनीने या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाशिंग मशीन आणि ड्रायर भेट दिले होते. या प्रसंगी पोस्को मॅनेजमेंट टीम म्हणाली, आम्हाला आनंद आहे की या उपक्रमांमुळे आम्ही या निवासी शाळेत राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकलो. एक कंपनी म्हणून आम्ही अशा प्रकारच्या उपक्रमांद्वारे समाजाच्या सामाजिक विकासासाठी योगदान देण्यावर नेहमीच लक्ष केंद्रित करू.